# नरव्याघ्र

*(साम्राज्यवादी बादशहा अकबराचा सर्वधर्म समभाव हे ढोंग असल्याचे ओळखून राणा प्रताप यांनी सतत २५ वर्षांहून अधिक काळ रानावनात राहून अकबराच्या सेनेशी कडवी झुंज दिली व त्याचे मेवाड पादाक्रांत करण्याचे मनसुबे उधळून लावले.)*

**अनंत तिबिले**

**रिया पब्लिकेशन्स्**

**नरव्याघ्र : अनंत तिबिले**

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
९६८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ४००/-

उल्हास मेहता यांना...

**– अनंत तिबिले**

# एक

चितोडच्या शाही महालातील राणीवशात आपल्या महालातील मंचकावर महाराणी जयवंतादेवी काहीशा गंभीर मुद्रेने स्वस्थ बसून होत्या. जयवंतादेवी राणा उदयसिंहांच्या प्रथम पत्नी. अक्षयराज सोनगरा यांच्या सुकन्या. चितोडच्या राणीला साजेसं त्यांचं रूप होतं. नाजूक, गौरकांतीची देहलता. उंचापुरा बांधा. किंचित उभट चेहरा. उभट चेहऱ्याला शोभून दिसणारे तेज, समशेरीवत सरळ धारदार नासिका. किंचित मोठे, पण काळेभोर डोळे. विशाल भालप्रदेश. काळाकुरळा विपुल केशसंभार आणि राजघराण्याला खुलून दिसणारं असामान्य रूप, तेवढीच शालीनता. त्यांच्या काळ्याभोर नयनद्वयीवरील काळ्याभोर आकर्षक भृकुटी म्हणजे जणू धनुष्यावतच भासत होत्या... आणि त्यांची नजर जणू तेज-तीक्ष्ण शरागत होती. कुणाचाही कलेजा खलास करण्याचं सामर्थ्य त्या नजरेत खासच होतं.

तसं पाहिलं तर जयवंतादेवींचं यौवन अजून ओसरलं नव्हतं. उलट तारुण्याला बहरच आला होता. ऐन उभारीची उमर होती त्यांची. चितोडाधिपतीला अंकित करण्याचं बळ त्यांच्या असामान्य सुंदर, देखण्या, यौवनभारानं लहडलेल्या अंगोपांगांवर विराजमान झालेलं होतं आणि आपण कोणत्याही हालतीत चितोडाधिपतींना अंकित करूच करू याबद्दल त्यांना यकीनही होता. अर्थात त्यांचा हा यकीन अवास्तव होता असं समजण्याचं काहीच कारण नव्हतं. कारण पुरुषाला बांधून ठेवण्याची सर्व सामग्री एकलिंगजींनी त्यांना मेहेरनजर

केलेली होती. चितोडचा इतिहास जसा पुरुषार्थाचा, पराक्रमाचा, शौर्याचा तद्वतच सौंदर्याचं उचित मोल करणाऱ्या रसिकांची महान गाथा. राजपुतांनी आजपावेतो जसं युद्धावर प्रेम केलं होतं, आपल्या हाती आलेली शस्त्रं हाताळली होती, आपलं पौरुषत्व दुनियेला दाखवून दिलं होतं तद्वतच ते सौंदर्यावर आसक्त झाले होते. रत्नाचं मोल जसं रत्नपारख्यानंच करावं तद्वतच लावण्य रसिकानेच हाताळावं, त्याचा संग्रह करावा हेही रजपुतांनीच जगाला दाखवून दिलं होतं. त्यांची सौंदर्यावरील आसक्ती इतरांच्या चर्चेचा विषय होता. याचं खरं कारण हेच तर होतं.

महाराणी जयवंतादेवीला हे ज्ञात होतं. अर्थात विवाहाआधी अनजान उमरमध्ये याची त्यांना जाण असणं कदापि शक्य नव्हतं; परंतु विवाहानंतर जसजसं वय वाढू लागलं, यौवन बहरू लागलं, स्वत:च्या असामान्य लावण्याची त्यांना जाणीव होऊ लागली तसतशा या बळावर आपण आपल्या पुरुषाला सहजासहजी अंकित करू याबाबत त्यांना खात्री वाटू लागली. कमलदलात भ्रमर अडकतो तद्वतच आपण आपल्या रूपबंधनात, लावण्यात राणाजींना अडकवून टाकू याबद्दल त्यांना संदेहच नव्हता. स्त्रीचं सौंदर्य हेच तर तिचं खरंखुरं सामर्थ्य असतं आणि यापुढं पुरुषाच्या पराक्रमाचं तेजही फिकं पडतं, ही समज आलेल्या महाराणी जयवंतादेवींना अन्य कुणी सांगायची आवश्यकताही नव्हती...

विवाहानंतरचा काही काळ याच अवस्थेत गेला. राणा उदयसिंह सर्वार्थाने महाराणींच्या मोहजालात अडकले. महाराणींच्या सहवाससुखात रत झाले. देहभान हरपून त्यांनी आपलं सर्वस्व महाराणींच्या पदी वाहिले आणि महाराणी जयवंतादेवी धन्य झाल्या...

राणा उदयसिंहही देखणे होते. रजपुतांना शोभा देणारं शौर्य त्यांच्या ठायीही वसत होतं... युद्धप्रसंगी त्यांनीही वीराला साजेसा पराक्रम केला होता. स्त्री पुरुषाला आपल्या सौंदर्याच्या सामर्थ्याने जखडून टाकते, याउलट पुरुष मात्र पराक्रमाच्या जोरावरच स्त्रीला जिंकत असतो. समाजातल्या सगळ्याच स्त्रिया काही वैभवाने दिपून जात नाहीत. पराक्रमाचीच पूजा उचित असं समजणारी स्त्रीच खरी स्त्री... जयवंतादेवी यापैकीच एक होत्या...

त्यातच राणा उदयसिंहांबद्दल अपार स्नेह, असीम श्रद्धा आणि अमाप सहानुभूती महाराणी जयवंतादेवींच्या उरी वसण्यास आणखीन एक महत्त्वाचं निमित्त झालं होतं... आणि विवाहानंतर स्वत: राणा उदयसिंहांनीच ते स्वमुखाने त्यांना सांगितलं होतं...

महाराणी जयवंतादेवींना तो प्रसंग आजही आठवत होता...

राणाजी स्वत:च त्या दिवशी राणीवशात आले होते. रात्रीचा समय. पूर्ण एकांत आणि महालात राणाजी आणि त्या स्वत: या दोघांशिवाय अन्य कुणीच नव्हते. महालातील



दीपदाणी आपला मंद प्रकाश सांडत होती. स्वत: जयवंतादेवी आपल्या मंचकावर बसलेल्या होत्या आणि राणाजी, याच मंचकावर आडवे होऊन एकटक त्यांच्याच मुखकमलाकडे पाहात होते.

जयवंतादेवी लाजल्या. त्यांचे गौर मुखमंडल लज्जेने आणखीनच आरक्त बनले. गोऱ्या गालांवर लाख लाख गुलाब फुलले. नजर झुकली. उन्नत उरोभाग उगाचच विलक्षण वेगाने वरखाली होऊ लागला. त्यांचं तरुण, मीलनोत्सुक अंग तापलं. नाजूक तनुलतेवर गोड रोमांच उभे राहिले. त्यांनी घुंघट लांबलचक काढून त्यात आपला सुंदर मुखचंद्रमा लपविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला आणि मृदू-मधुर स्वरात विचारले,

''स्वारी काय पाहते आहे एवढं आमच्याकडे?''

''चंद्रमा !''

''पण तो तर आकाशात असतो...''

''गलत बात आहे ही !... कधी कधी चंद्र जमिनीवरही अवतरतो. तोही पूर्णत: पौर्णिमेचा. आज या क्षणी तर तो प्रत्यक्ष आमच्यासमोर आपल्या तेजाने, अनुपम सौंदर्याने तळपतो आहे. आम्ही आज त्याचंच तर सौंदर्य आमच्या नजरेने पीत आहोत. पण का कुणास ठाऊक आमची तृष्णा शांतच होत नाही. आमचं पोट भरतच नाही. या मुखचंद्रम्याचं कितीही वेळ दर्शनसुख घेतलं तरी आमचं मन तृप्तच होत नाही...''

जयवंतादेवी काहीच बोलल्या नाहीत, मात्र त्या अधिकच लाजल्या. त्यांना घुंघट दूर करून, नजर वर करून राणाजींकडे पाहण्याचं साहसच होईना. त्या तशाच बसून राहिल्या- काहीही न बोलता...

''जयवंताऽऽ'' राणाजींची हाक.

''जी राणाजी?''

''आम्ही हे स्वप्नातही अपेक्षिलं नव्हतं...''

''राणाजींना काय म्हणायचं आहे?''

''एवढंच की, आमच्या आयुष्यात हा दिवस उगवेल, हा सुवर्णक्षण आमच्या हाती गवसेल, प्रत्यक्ष स्वर्गसुखाचा स्वाद चाखण्याचा मौका आम्हाला पावेल असं कध्धी कध्धीसुद्धा वाटलं नव्हतं. उलट आमच्या नजरेसमोर अमावस्येचा गडद काळोख होता. आशेच्या अस्पष्टशा रेषेचंही दर्शन आम्हाला दुर्लभ झालं होतं.''

राणाजी क्षणभरच थांबले. जयवंतादेवीही काहीच बोलल्या नाहीत. त्या राणाजी पुढे काय सांगतात हे ऐकण्यासाठी अधीर बनल्या...

''देवीऽऽऽ'' पुन्हा राणाजींनी हाक मारली. राणाजींचा स्वर काहीसा गंभीर बनला होता. जयवंतादेवींचा घुंघटही त्यांनी नकळतच मागे सरकवला होता. शिवाय त्या नजर

उचलून राणाजींकडेच पाहात होत्या. पण राणाजी स्वप्नात हरवल्यासारखे महालाच्या खिडकीतून समोर पसरलेल्या गडद अंधकारातून अचूक आपला भूतकाळ शोधून काढण्याच्या प्रयत्नाला लागले होते...

बहुतेक त्यांना काहीतरी सापडले असावे. त्यांनी लगेचच बोलायला सुरुवात केली. ते म्हणाले, ''काळ मोठा कठीण होता. चितोडचा इतिहास म्हणजे तसं पाहता पराक्रमाची, शौर्याची गाथा. चितोडमध्ये अनेक वीर जन्माला आले आणि स्वपराक्रमाने त्यांनी देश नि धर्माची हिफाजत केली. त्यात राणा संग्रामसिंहाचं नावही आदरानं घ्यावं लागतं. आम्ही ते आदराने घेतोही. देवी, त्या वेळी दिल्लीच्या तख्तावर बाबर होता. अमाप सैन्यबळ, अगणित द्रव्य होतं त्याच्यापाशी. वैभवशाली चितोडचं वेडही लागलं होतं त्याला दुर्भाग्यानं. राणाजींना त्या वेळी केवळ त्याच्याशी झगडण्यासाठी चितोडचा त्याग करावा लागला होता. बाबराकडील सैन्य नि द्रव्य यांच्या तुलनेत आपण दुबळे आहोत याची खात्री असूनही त्या वेळी राणाजी म्हणाले होते, 'मैं चितोड लौटकर उस समय तक न जाऊँगा, जब तक मैं मुगल बादशाह को पराजित न कर लूंगा...''

''मग राणाजींनी बादशहाला पराजित करून आपले शब्द खरे केले?''

जयवंतादेवींनी नकळतच सवाल केला. तसे राणा उदयसिंह गंभीर झाले. म्हणाले,

''राणाजींनी प्रयत्नांची शर्थ केली. बादशहाशी निकराचे युद्ध केले. अतुलनीय पराक्रम गाजविला; परंतु बादशहाचं बळच मोठं होतं. सैन्यही अमाप होतं त्याचं. त्यामुळेच राणाजींचा पराक्रम थिटा पडला आणि बाबर विजयी झाला...''

''आणि राणाजींना वीरगती...''

पण जयवंतादेवींना पुरतं बोलूही न देता राणा उदयसिंह उत्तरले, ''ते भाग्य त्यांना लाभले नाही. राणाजी पराजित झाल्याने मेवाडमधल्या पर्वतात वास्तव्यास गेले आणि मग वर्षभरातच बसवा नावाच्या ठिकाणी त्यांनी देह ठेवला...''

''याचा अर्थ चितोड रजपुतांच्या हातून मुगलांनी हिसकावून घेतले; असंच ना?''

''देवी, दुर्दैवाने काही दिवस चितोड बाबरच्या हातात गेलं खरं, परंतु तद्नंतर राणाजींचे सुपुत्र रत्नसिंग यांनी ते प्राप्त केलं नि स्वत: चितोडचं उत्तरदायित्व स्वीकारलं. जयवंता, राणा रत्नसिंह शूर होते, पराक्रमी होते, परंतु कूपमंडूक वृत्तीचे होते. वास्तविक त्यांनी आपला पराक्रम मुगलांच्या विरुद्ध उभा करून पराजयाचा प्रतिशोध घ्यायला हवा होता. पण दुर्दैवाने तसं घडलं नाही. त्यांनी स्वकीयांपैकी बुंदीचे राजे सूरजमल यांच्याशी वैर निर्माण केलं... गृहकलह वाढला. शिकारीच्या निमित्ताने सूरजमलला ठार करण्याचा हेतू मनात धरून ते जंगलात गेले, पण अखेर सूरजमलकडूनच त्यांची हत्या झाली आणि चितोड निराधार बनलं...''



''राणाजी, एक सवाल विचारू आपल्याला?''

''जरूर विचारावा देवींनी.''

''आपण आत्ताच हे सगळं आम्हाला का सांगत आहात?''

''त्यालाही एक वजह आहे.''

''ती कोणती राणाजी?''

''देवी, त्यानंतर चितोडच्या वैभवशाली इतिहासाला कलंकित करणाऱ्या, रजपुतांना शरमेने गर्दन झुकवायला भाग पाडणाऱ्या काही गोष्टी घडल्या...''

''खरं की काय !''

''होय देवी !''

''राणाजींनी त्या आम्हाला सांगाव्यात.''

''जयवंता, राणा रत्नसिंहानंतर चितोड राणा विक्रमजितांच्याकडे आलं. राणा संग्रामसिंह आणि राणा रत्नसिंह यांच्यात निदान रजपूत वीरांना शोभतील असे चार-दोन गुण नक्कीच होते; परंतु राणा विक्रमजित अवगुणांनी परिपूर्ण असेच होते. राजाला आवश्यक असलेला दूरदर्शीपणा, विवेक आदी गोष्टींचा अभाव आणि विलासी वृत्ती यामुळे चितोडचा कार्यक्षम नि जबाबदार सामंतगण नाराज बनला. त्यातच राणाजींनी क्षुद्र वृत्तीच्या सुखलोलुप सामान्यजनांशी हातमिळवणी करून राज्याच्या अधिकाऱ्यांना दुखवायला, त्यांचा अवमान करायला सुरुवात केली. अधिकारी नाराज झाले. राणाजींची विलासी वृत्ती, आळस, बेजबाबदारपणा नि विषयलोलुपता याचा परिणाम म्हणूनच की काय राजकुमार पृथ्वीराजने गुजराथच्या बादशहा मुजफ्फरला कैद करून नि त्याला बंदी बनवून चितोडला घेऊन जाऊन गुजराथला अपमानित केले होते. त्याचा प्रतिशोध घेण्याच्या इराद्यानेच गुजराथ उभे राहिले होते... तेही बादशहा बहादूरच्या रूपाने !...' त्याने राणा विक्रमजिताच्या विलासी वृत्तीचा अचूक फायदा उठविला आणि चितोडवर हल्ला केला...''

''आणि याचा परिणाम म्हणून चितोडला मानहानी पत्करावी लागली; असंच ना?''

''देवी, स्वत: राणा विक्रमजित अयोग्य नि डरपोक होता. त्याचा बहादूरपुढं निभाव लागणं शक्यच नव्हतं. विषयलंपट नि विलासी वृत्तीची माणसं पराक्रमाच्या कसोटीला कधीच उतरत नाहीत हे कुणी कुणाला सांगण्याची खरंच गरज नाही. या क्षणी राणाजींना सामंत, मंत्री नि सैन्यबळ प्राप्त झालं असतं तर काही अंशी ते बहादूरला विरोध करूही शकले असते. पण राणाजींनी या सगळ्यांनाच दुखावलेले होते. साहजिकच विक्रमजितांना पराभव पत्करावा लागला; पण तरीही बहादूरला चितोड सहजासहजी हस्तगत करताच आले नाही...''

''म्हणजे? आपल्याला काय म्हणायचं आहे राणाजी?''

''देवी, बहादूरच्या विरोधात चितोडची स्वाभिमानी जनता उभी राहिली. त्यांना मदत केली वंशधर देवल नगरचा राणा सूरजमल, बूँदीचा राजकुमार, शोनगड, देवर आदी देशाभिमानी रजपूतही चितोडच्या मदतीला धावले. त्यांनी शर्थीचा पराक्रम केला. रजपुतांना शोभणारं युद्ध झालं, पण बादशहाच्या पदरी एक इंग्रज गोलंदाज होता - लाब्री त्याचं नाव. तो हुशार तितकाच चाणाक्ष होता. त्याने सुरुंग लावला... त्याला बत्ती दिली. दारूगोळ्याचा प्रचंड स्फोट झाला आणि त्यात अनेक रजपूत वीर कामी आले. देवी, या युद्धात नुसते रजपूत वीरच कामी आले नव्हते तर चितोडच्या महाराणी जवाहरदेवी याही धारातीर्थी पडल्या. एवढ्या प्रबळ प्रतिकाराला तोंड देऊनच बहादूरशहाला चितोड हस्तगत झाले होते...''

''मग चितोड पुन्हा कसे रजपुतांना प्राप्त झाले?''

''राणी कर्मवतीच्या दूरदर्शीपणाने. तिने दिल्लीच्या बादशहाला-हुमायूनला राखी पाठवून आपला बंधू बनविले आणि त्याच्या साहाय्यानेच चितोड पुन्हा हस्तगत केले...''

''राणा विक्रमजित त्यावेळी हयात होते?''

''दुर्दैवाने खरंच ते हयात होते, आणि तेवढ्याच दुर्दैवाने पुन्हा तेच चितोडचे राणा बनले...''

जयवंतादेवी काहीच बोलल्या नाहीत. क्षणभराने राणा उदयसिंह म्हणाले, ''देवी, पराभवाने खचून न जाता पराभवाचा कलंक धुऊन काढण्यासाठी पराक्रमाची परिसीमा गाठणारा रजपूत राणा. अन्यथा केसरिया आणि जोहार करून आपल्या क्षात्रतेजाने जगाला दिपविण्याची मेवाडची वृत्ती पण राणाजी नेमके हेच विसरले होते. आपल्याला पुन्हा सत्ता लाभली म्हणजे विधात्यानं पुन्हा एकदा विलासाला मोका दिला असंच त्यांना वाटू लागलं. सामंतगणांचा... ज्यांच्या पराक्रमाने आपण हे वैभव पुन्हा प्राप्त करू शकलो त्यांचाही विसर पडला त्यांना... त्यांनी पुन्हा याच लोकांची मानहानी सुरू केली. कर्मसिंहासारख्या वृद्ध, एकनिष्ठ, बुजुर्ग अधिकाऱ्याचाही उपमर्द करायला त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. जयवंता, मेवाडची जनता म्हणजे चितोडाधिपतीला एकलिंगजीस्वरूप समजणारी. त्यांच्या ठायी श्रद्धा ठेवणारी, त्याच्यासाठी सर्वस्व बलिदान करणारी, प्रसंगोपात समर्पण करून राणाजींची हिफाजत करणारी; पण यावेळी मात्र विपरीत घडले. चितोडचा सामंतगण-जो राणाजींच्याकडून उपमर्दिला, अपमानित केला गेलेला होता तो राणाजींविरुद्ध उभा ठाकला. एवढंच नव्हे तर चितोडचा ज्वलंत इतिहास विलासात बुडवू पाहणाऱ्या राणाला त्याने स्वहस्तेच



सिंहासनावरून दूर केले आणि ज्याचा चितोडच्या सिंहासनावर कोणत्याही प्रकारचा अधिकार नाही तो बनबीर केवळ मंत्रीगणाच्या इच्छेस्तव चितोडाधिपती बनला...''

''राणा बनबीर म्हणजे पृथ्वीराजांच्या घराण्यातलाच?''

''हाँ देवी !... प्रथमतः तो स्वतःही या गोष्टीला राजी नव्हता. आपला चितोडवर कोणत्याही प्रकारचा अधिकार नाही याची त्याला चांगली जाणीवही होती. पण सत्ता म्हणजे मदिरेसारखी असते. तिची नशा मदिरेच्या नशेहून घातक. मदिरेची धुंदी निदान काही काळापुरती तरी मर्यादित असते पण सत्तांधता उतरतच नाही. मानवी मनावरून, नव्हे ती माणसातलं मनुष्यपण संपविते आणि मग माणूस माणूसच राहात नाही. बनतो सैतान...''

''राणा बनबीरच्या बाबतीत असंच घडलं होतं का राजन?''

''होय देवी, हे असंच घडलं होतं आणि आमची वेळ बरी नसती तर आज आम्ही आपल्यासमोर हे असे उभेही दिसलो नसतो...''

''म्हणजे? आपल्याला म्हणायचं तरी काय आहे?''

''एवढंच की अल्पावकाशात बनबीर सत्तांध बनला. त्याच्यातलं मनुष्यत्व संपलं. आज ना उद्या राणा विक्रमजित चितोडवर आपला अधिकार सांगू लागेल आणि मग न जाणो, आपल्याला वैभवशाली चितोडवरचा अधिकार सोडावा लागेल. केवळ या भयानेच त्याने विश्वासघाताने प्रथम राणाजींचीच हत्या केली !...''

जयवंतादेवी गंभीर बनल्या. बनबीरबद्दलची घृणा अगदी स्पष्टपणे त्यांच्या मुद्रेवर दिसू लागली. त्या हळव्या मनाच्या नि कोमल हृदयाच्या एक स्त्री ! माणूस सत्तेसाठी एवढा क्रूर बनू शकतो यावर क्षणभर त्यांचा विश्वासही बसला नाही पण समोर प्रत्यक्ष त्यांचे स्वामीच होते. त्यांच्या मुखातूनच त्यांना हे सारे ऐकावे लागले होते. साहजिकच ऐकलं ते कठोर असलं तरी असत्य असावं असं म्हणण्याचं साहस त्यांना होणं अशक्य होतं. त्यांचा राणाजींवर पूर्ण विश्वास होता...

''देवी, त्या वेळी आम्ही अगदीच लहान होतो. लहान होतो म्हणूनच तर आमच्या पिताजींच्या... राणा संग्रामसिंहांच्या मृत्यूनंतर चितोडचं आधिपत्य राणा विक्रमजितांच्याकडे गेलं होतं, पण एक ना एक दिवस ते आमच्याकडे येणार याबद्दल कुणालाच शंका नव्हती. खुद्द बनबीरलाही...''

''बनबीरने स्वारींच्यावरही काही अघोरी...''

पण जयवंतादेवींना पुरतं बोलूही न देता राणा उदयसिंह म्हणाले, ''आम्हीही बनबीरच्या मार्गातला एक फार मोठा अडसर होतो. आज ना उद्या आम्ही आमच्या हक्कासाठी त्याच्यासमोर उभे राहणार होतो आणि चितोडवासीजनांना साक्षी ठेवूनच आमची न्याय्य मागणी बनबीरसमोरच पेश करणार होतो. देवी, तसं झालं असतं तर आमचा हक्क

डावलणं बनबीरलाही अशक्य झालं असतं. कारण विश्वासघाताने केवळ सत्तेसाठी राणा विक्रमजितांचा वध करणारा बनबीर नरपशू आहे याची चितोडवासीजनांना खात्री झालेली होती. तोही जनताजनार्दनाच्या मर्जीतून साफ उतरला होता...''

राणाजी क्षणभर थांबले. त्यांनी आपली नजर जयवंतादेवींच्या मुखावर रोखली नि ते स्वत:शीच पुटपुटल्यासारखे म्हणाले, ''ज्याच्या मागे एकलिंगजी उभा असतो ना, त्याचं अहित करणं कुणा माणसाला शक्यच होत नाही !... एकलिंगजी कुणा ना कुणाच्या रूपात समोर उभा राहतो आणि आपल्या प्रियजनांची हिफाजत करतो. आमच्याहीबाबत अगदी हेच घडलं...''

राणाजी पुन्हा एकदा थांबले. स्वत:तच हरवले आणि स्वप्नातल्यागत पुटपुटू लागले, ''देवी, पन्ना तिचं नाव !... हो पन्नाच... पन्नाबाई...''

''कोण होती ही?''

''आमचा सांभाळ करणारी एक सामान्य स्त्री...''

''तिने काय केलं राजन?''

''खूप काही !... ती सामान्य स्त्रीच प्रत्यक्ष एकलिंगजी बनली. तिने आम्हाला आधार दिला. देवी, राणा विक्रमजितांची हत्या झाल्याची खबर प्रथम तिनेच ऐकली आणि मग आमचं भवितव्यही तिला चट्कन उमगलं. बनबीर आम्हाला जिवंत सोडणार नाही याची तिला तत्क्षणी खात्री झाली आणि मग तिने तुरंतच हालचाल केली...''

''म्हणजे नेमकं केलं तरी काय त्या पन्नाने?''

''त्या वेळी आम्ही गाढ निद्रेत होतो आणि आणखीन काही वेळ आम्ही तिथेच तशाच अवस्थेत राहिलो असतो तर आम्हाला खरंच चिरनिद्रा लाभली असती पण ते होणे नव्हते. नव्हे, एकलिंगजीलाच जणू काही ते मान्य नव्हते. म्हणूनच पन्नाला सुबुद्धी सुचली. तिने आम्हाला आमच्या निद्रावस्थेतच एका टोपलीत घातले. कुणाला संशय येऊ नये म्हणून त्यावर फुलं रचली आणि मग ही टोपली तिने महालात काम करणाऱ्या एका नोकराच्या स्वाधीन केली...''

''तो विश्वासू होता का?''

''हो ! पन्नाचाच माणूस होता तो. शिवाय विक्रमजितांचा वध झाल्याची खबर त्यानेच आणली होती. पन्नाने आम्हाला चितोडबाहेर सुखरूप नेण्याची जिम्मेदारी त्याच्यावरच टाकली.''

''आणि त्याने ती व्यवस्थितरित्या पार पाडली, असंच ना?''

''होय देवी ! तो पन्नाच्या आज्ञेबरहुकूम वागला. आम्ही सुरक्षित चितोडबाहेर पडलो पण एवढ्याने आमचं दुर्दैव संपलं नाही.''



''म्हणजे बनबीरने आपण निसटल्याचं ओळखून आपल्याला पकडण्याचा तर प्रयत्न केला नाही ना? किंवा आपणास जेरबंद...''

''नाही ! बनबीरला ते जमले नाही. त्याने आमचा शोध केला, पण आम्ही कुठे नि कसे निसटलो याचा काहीच अंदाज बांधता न आल्याने त्याला हात चोळतच बसावे लागले...''

''मग स्वारी आपलं दुर्दैव एवढ्यावरच संपलं नाही असं का म्हणाली?''

''जयवंता, त्या वेळी आमची उमर अगदीच कमी होती. आमचं असं या दुनियेत कुणीच नव्हतं. आम्ही चितोडचे भावी नरेश असूनदेखील त्या क्षणी अनाथ आणि पोरके होतो. केवळ पन्नाचा आधार होता, पण पन्ना आमच्यापाशी राहणंही धोक्याचं होतं. कारण त्यामुळे आमचं सत्य स्वरूप स्पष्ट होण्याचा संभव होता. म्हणूनच पन्नाने आमच्या संगोपनासाठी अनेकांना विनवलं. असंख्य लोकांची मनधरणी केली. बाधजींचे सुपुत्र सिंहाराव, डुंगरपूरचे नरेश रावळ यशकरण हेसुद्धा बनबीरला घाबरले. त्यांनी आमचा सांभाळ करण्यास नकार दिला. अखेर काही भिल्लांच्या मदतीने पन्ना अरवली पर्वतांच्या दुर्गम रांगा ओलांडून ईदर पार करून कमलमीरच्या किल्ल्यात येऊन पोहोचली.''

''यावेळी कमलमीरचे अधिपती कोण होते राजन?''

''आशाशाह ! प्रथम राणा बनबीरच्या भीतीने यांनीही आम्हाला आसरा देण्याला नकार दिला, परंतु नेमक्या वेळी त्यांच्या मातोश्रींचं स्त्रीमन द्रवलं. त्यांनीच आशा शाहला समजाविलं आणि मग आशाशाहनेही आपला निर्णय बदलला. आम्हाला आधार गवसला. यथावकाश आम्ही मोठेही झालो, पण पन्ना... आजतागायत आम्ही तिला विसरू शकलो नाही...''

''साहजिकच आहे राणाजी ! पन्ना वेळीच आपल्या मदतीला धावली नसती तर आपण म्हणता त्याप्रमाणे आपल्याशी जीवन बांधून घेण्याचं भाग्य आम्हास लाभलं नसतं...''

''पण त्यासाठी पन्नाला केवढा त्याग करावा लागला होता याची कल्पना आहे का जयवंता तुला?''

''म्हणजे पन्नाने आपल्यासाठी आणखीनही काहीतरी केलं होतं तर...?''

''हो ! एक भव्यदिव्य काम. एक असामान्य त्याग ! जो आजपावेतो कुणी केला नव्हता आणि यापुढेही कुणी करण्याची शक्यता नव्हती, एवढा त्याग...''

''राणाजींनी आम्हाला पन्नाच्या त्यागाबद्दल स्पष्टपणाने सांगावं...''

राणा उदयसिंह पुन्हा गंभीर झाले. पुन्हा एकदा स्वत:तच हरवले. त्यांची नजर पुन्हा एकदा समोरच्या खिडकीतून बाहेरील गडद अंधाराचा वेध घेऊ लागली. जणू काही या अंधारातच त्यांचा गतकाल दडलेला होता.

त्यांनी पुन्हा बोलायला सुरुवात केली. त्या वेळी त्यांचा स्वर गद्‌गद्‌ बनलेला होता. ते म्हणाले, ''देवी, बनबीर शीतल नावाच्या एका दासीचा पुत्र. त्याचा चितोडवर अधिकार असणं कदापि शक्य नव्हतं. एकनिष्ठ नि राजनिष्ठ पन्नाला हे ठाऊक होतं. म्हणूनच विक्रमजित ठार झाल्याचे कानावर येताच तिने बारी नामक एका नोकराकरवी आम्हाला चितोडबाहेर काढलं आणि त्याच वेळी नीच बनबीर तिच्यापाशी पोहोचला. त्याच्या हातात समशेर होती. विक्रमजिताच्या रक्तात रंगलेली. त्याच्या नजरेतही रक्त उतरलेलं होतं. त्यानं विचारलं, 'उदयसिंह कुठे आहे?' पन्ना घाबरली. तिचं सर्वांग लटलट कापू लागलं. तिच्या मुखातून शब्दही बाहेर पडला नाही.''

''पुढं काय झालं राणाजी?''

''देवी, त्याच वेळी बनबीरचं लक्ष तिच्या शेजारी निद्रावस्थेत असलेल्या एका निष्पाप बालकाकडे गेलं... त्याचे नेत्र चमकले. हवं ते सापडल्याचा आसुरी आनंद त्याच्या मुखावर विलसू लागला.''

''पण ते बालक कुणाचं होतं?''

''स्वत: पन्नाचं ! आमच्याइतकीच उमर होती त्याची. नीच बनबीर त्याला उदयसिंह समजला आणि त्याने त्या निष्पाप बालकावर समशेरीचा घाव घातला. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. त्या अजाण मुलाचं मस्तक धडावेगळं झालं. एका सैतानानं प्रत्यक्ष मातेच्या समक्ष तिच्या पुत्रालाच यमसदनाला धाडून तिच्या काळजाचेच तुकडे तुकडे केले होते आणि असहाय माता ऊर बडवून घेत आक्रोश करू लागली होती. पण हलकट-नीच-कठोर बनबीरला त्याचं काहीच वाटलं नाही. तो विजयी वीराच्या आविभार्वात तिथून निघूनही गेला होता.''

राणाजींचे नेत्रद्वय आसवांनी डबडबले होते. जयवंतादेवींच्या कमलनयनांतून तर गंगा-यमुनांचा पूर वाहू लागला होता.

बाहेरचा अंधार आणखीनच गडद बनत चालला होता.

''देवीऽऽऽ'' राणाजींची हाक कानावर आली.

जयवंतादेवींनी ओल्या नजरेने त्यांच्याकडे पाहिलं.

''एकदा पन्ना आम्हाला भेटली होती. आम्ही तिला आमच्याकडून काय हवं ते मागून घेण्यास नम्रपणानं सुचविलं होतं.''

''त्या वेळी पन्ना काय म्हणाली होती?''

''म्हणाली होती, 'राणाजी, ही कनीज जे हरवून बसली आहे ते देण्याचं सामर्थ्य प्रत्यक्ष एकलिंगजीपाशीही नाही... आपण मला द्रव्य द्याल, आभूषणं द्याल, घर... जमीन



सारं सारं काही द्याल, पण अपत्यहीन मातेला याचा काहीच उपयोग नाही. द्रव्यानं पोटाची भूक भागेल, पण एका अपत्यहीन मातेचा आत्मा आपल्या पिलाला कुशीत घेण्यासाठी, त्याच्या स्पर्शसुखानं उत्तेजित होण्यासाठी जो तडफडतो आहे ती तडफड आता कशानेच शांत होणार नाही !' देवी, पन्नाचा शब्द नि शब्द खरा होता. मातेला अपत्याहून श्रेष्ठ असं दुनियेत अन्य काहीच नसतं. आम्ही ते जाणलं. केवळ आमच्या हिफाजतीसाठी पन्ना अपत्यहीन बनली होती. आमचा ऊर भरून आला... मातेच्या कुशीत शिरावं तद्वतच आम्ही पन्नाच्या कुशीत शिरलो आणि भरल्या गळ्याने म्हणालो, 'पन्ना, बनबीरसारख्या नीचाच्या हातून मारला गेला तो उदयसिंह, आज तुझ्या कुशीत आहे तो तुझा पुत्र असंच समज आणि केव्हाही या तुझ्या पुत्राला हाक मार. आम्ही धावत येऊ...''

राणाजी थांबले. जयवंतादेवींनाही काय बोलावे हे समजले नाही. पन्नाच्या असीम त्यागाने त्यांचा ऊर भरून आला होता.

केवळ चितोडवरील निष्ठेपायी स्वपुत्राचा अघोरी संहार ज्या पन्नाने प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिला, आपल्या काळजावरील घाव मुखातून ब्र ही न काढता बर्दाश्त केला, अन्त्यवेळपर्यंत भावी चितोडाधिपतीचं रहस्य प्राणमोलानं आपल्या उरात जतन करून ठेवलं, त्या पन्नाबद्दल त्यांच्या मनात आदरभाव वसू लागला होता आणि एकदा पन्नाला डोळे भरून पाहण्यासाठी त्या अधीरही बनल्या होत्या.

त्याच वेळी राणाजींची हाक त्यांच्या कानांवर आली, ''जयवंताऽऽऽ''

''जी स्वामी?''

''पन्नाने एक गोष्ट मात्र आमच्याकडे आग्रहाने मागितली.''

''ती कोणती राजन?''

''पन्ना म्हणाली, 'राजन, बनबीर दासीपुत्र, त्यातच वृत्तीनं कसाई. तो शिसोदिया वंश नष्ट केल्याच्या समाधानात वावरतो आहे. त्याच्या अपवित्र, अमंगल स्पर्शानं चितोडचं सिंहासन कलंकित बनलेलं आहे. हा कलंक धुऊन निघायला हवा. बनबीरसारखा असुर मारायला हवा. त्याच्या कपटातून आणि कृष्णकारस्थानातून चितोडच्या जनतेची सुटका व्हायला हवी; शिवाय शिसोदिया वंशाची वृद्धीही व्हायला हवी. हे ज्या वेळी घडेल त्या वेळीच या दासीला समाधान प्राप्त होईल. ही दासी कुठेही असली तरी तृप्त होईल.''

''पन्नाने योग्य आणि उचित असंच मागितलं होतं राजन...''

''आणि आम्ही तिला दिल्या शब्दाप्रमाणे वागायलाही सुरुवात केली होती. एकलिंगजींच्या कृपेने आम्हाला तसा मौकाही पावला होता. आम्ही सुरक्षित असल्याची खबर चितोडच्या सामंतगणांना लागताच बनबीरवर असंतुष्ट असलेले सारे आमच्याकडे

धावले होते. त्यांनी आम्हाला आधार दिला होता. त्यांच्याच आधारावर आम्ही मोठेही होऊ लागलो होतो आणि त्याच वेळी बनबीरचा सूड घेण्याची संधी आम्हाला पावली होती.''

''म्हणजे काय घडलं होतं राणाजी?''

''देवी, बनबीरने आपल्या कन्येसाठी पाचशे घोडे आणि दहा हजार बैलांच्या पाठीवर बरंचसं सामान लादून ते कच्छ प्रदेशाकडे धाडलं होतं. हे सारं आमचं होतं. यावर अधिकार चितोडचा होता. आम्ही सावध झालो. आमचा इशारा होताच आमचे सामंतगण धावून गेले आणि मग आमची फत्ते झाली. बनबीरने मुलीसाठी धाडलेलं द्रव्य आमच्या हाती लागलं...''

''आणि तद्नंतरच आपला विवाह झाला असंच ना?'' जयवंतादेवींनी पुसलं.

राणाजी हसले. म्हणाले, ''हो. विवाह झाला. आमच्या विरोधात उभे राहिलेले मालवजी आणि सोळंकी या दोन रजपूत सरदारांचाही आम्ही बिमोड केला आणि मग चितोडवर धावलो. आमच्या हक्कासाठी, आमच्या अधिकारासाठी, पन्नाला दिलेल्या शब्दासाठी. देवी, बनबीरचा पराभव झाला. तो आमच्या हाती सापडला असता तर पन्नाच्या पुत्राचा वध करणारे त्याचे निर्दयी हात आम्ही तोडणार होतो, त्याचे डोळे फोडणार होतो, त्याच्या रक्तात आमची समशेर रंगविणार होतो पण आमचं दुर्दैव, आम्हाला ती संधी मिळाली नाही. बनबीर आपल्या कुटुंबियांसमवेत दक्षिणेला पळून गेला...''

राणीवशातील आपल्या महालात पलंगावर पहुडलेल्या जयवंतादेवींना हे सारं आठवलं आणि त्या स्वत:शीच हसल्या. त्यांनी नकळतच निद्रावस्थेतच असलेल्या आपल्या पुत्राला आपल्या आणखीन जवळ ओढलं. आपल्या नाजूक बाहूंचा विळखा त्याच्या सर्वांगाभोवती टाकला आणि मग आपल्या लालचुटूक ओठांनी त्याच्या नाजूक ओठांशी हळुवारपणाने चाळा करीत त्या स्वत:शीच पुटपुटू लागल्या,

''प्रताप, तुझे पिताजी राणा उदयसिंहांपेक्षा तू सुदैवी. बालवयात तुझ्या पिताजींना निराधाराचं जिणं जगावं लागलं. आधारासाठी अनेकांच्या आश्रयाला जावं लागलं. अल्पवयातच मृत्यू त्यांच्या अवतीभवती घोटाळत होता. केवळ पन्नाच्या प्रेमामुळेच ते वाचले. यातलं सुदैवानं तुझ्या वाट्याला काहीच आलं नाही आणि यातलं काही तुझ्या वाट्याला कधीच येऊ नये अशी आमची इच्छा आहे. आमची इच्छा तृप्त करावयाची असेल तर तुला लवकर मोठं व्हायला हवं. शस्त्रास्त्रविद्यानिपुण बनायला हवं. पराक्रम गाजवायला हवा. आपल्या पौरुषार्थानं चितोडच्या ज्वलंत इतिहासात भर घालायला हवी. शिवाय चितोडचं वैभवही वाढवायला हवं. तुझ्या सुदैवानं तुला जन्मत:च सारं काही प्राप्त



झालं आहे. तद्नंतर हे राज्य तुमचं आहे. आम्हाला तू सिंहासनाधिपती झाल्याचं पाहायचं आहे. जेव्हा आम्ही हे याचि डोळा पाहू त्याच वेळी तृप्त होऊ. मग आमचीही इच्छा पूर्ण कराल ना प्रताप?''

रात्र वाढतच चालली होती; परंतु जयवंतादेवींना पत्ताही नव्हता. त्या एकटक निद्रावस्थेत असलेल्या प्रतापकडे पाहात होत्या.

आणि निद्रावस्थेतच प्रताप हसत होता. त्याचे नाजूक ओठ मोहकपणे विलग झालेले होते. जणू काही तो एखादं स्वप्नच पाहात होता.

◆◆◆

# दोन

राजपुरोहितांनी एकलिंगजींची यथासांग पूजा केली. त्यांच्या धीरगंभीर स्वरातील मंत्रोच्चाराने मंदिरातलं पावित्र्य आणखीनच वाढलं. मंदिरातील गाभाऱ्यात उभ्या असलेल्या एकलिंगजींच्या सर्वांगावर भरजरी वस्त्रे आणि मोजकेच; पण ठसठशीत असे सुवर्णालंकार होते. गळ्यात टपोरी मौक्तिक माला, माथ्यावर किरीट होता. किरीटातील रत्नं गाभाऱ्यातील दीपाच्या मंद प्रकाशात विलक्षण तेजाने चमचम करीत होती. एकलिंगजींच्या सुंदर मुखकमलावर मोहक हसू तरळत होतं. नेत्र अर्धोन्मीलित कलिकेसारखे देखणे भासत होते. मंदिरात धूपाचा मंदमधुर दर्प भरून राहिलेला होता.

''प्रतापऽऽऽ'' जवळच उभ्या असलेल्या लहानग्या प्रतापसिंहाला जयवंतादेवींनी हाक मारली. यावेळी प्रताप एकलिंगजींच्या लोभस, देखण्या मूर्तीकडे, मोहक मुखकमलाकडे एकटक पाहात होता. त्या देखण्या मुखकमलावरून आपली दृष्टीच काढू नये, प्रहर नि प्रहर एकलिंगजींकडे एकटक असेच पाहात राहावे असेच त्याला वाटू लागले होते. त्याचे मन प्रसन्न बनले होते.

पण जयवंतादेवींची हाक कानावर आली आणि त्याची तंद्री भंगली. तो भानावर आला. गर्दन वळवून आपले किंचित मोठे डोळे जयवंतादेवींवर रोखून मृदू-मधुर, नम्र स्वरात म्हणाला, ''जी माँसाहेब?''



''यांना ओळखता?'' एकलिंगजींच्या मूर्तीकडे अंगुलीनिर्देश करीत जयवंतादेवींनी विचारले.

''देव... या देवतामूर्तीला एकलिंगजी या नावाने संबोधतात असं आमच्या कानावर आलं आहे.''

''मग ते बरोबरच आहे !'' जयवंतादेवी उद्‌गारल्या आणि पुढं म्हणाल्या, ''नमस्कार केलास प्रताप एकलिंगजीला?''

प्रताप चटकन गुडघ्यांवर टेकला. त्याने मनोभावे आपले दोन्ही हात जोडले. नकळतच त्याचे नेत्रही मिटले गेले... त्याचे कोवळे ओठ त्याला नकळतच पुटपुटले, ''जय एकलिंगजी...''

''ऊठ आता...'' जयवंतादेवींनी फर्माविले. प्रताप उठला. त्याच वेळी राजपुरोहित त्याच्यासमोर येऊन उभे राहिले. त्यांनी आपल्या हातातील थाळ्यातून प्रसाद काढला आणि तो प्रतापच्या इवल्याशा हातावर ठेवला. जयवंतादेवींचा इशारा पाहताच त्याने तो आपल्या मुखात घातला...

पुन्हा एकदा एकलिंगजीला मनोभावे नमस्कार करून ते दोघेही मंदिराबाहेर आले.

मंदिराबाहेर समोरच्याच बाजूला विस्तृत असा सभामंडप होता. हा सर्व सभामंडप पूर्णत: संगमरवराचा होता. सभामंडपाच्या संगमरवरी खांबाला आकर्षक अशी कलाकुसर खोदण्यात आलेली होती. सभामंडपाच्या छतावर असलेली ही सुंदर वेलबुट्टी खोदणाऱ्याच्या कौशल्याची साक्ष पटवीत होती. सभामंडपाच्या सभोवती संगमरवराचाच चौथरा होता. बाहेरच्या बाजूला विशाल-गर्द वृक्षांची दाटी होती.

सकाळची वेळ पूर्वेकडून वर आलेल्या सहस्ररश्मी भास्कराच्या कोवळ्या सुवर्णशलाका थेट एकलिंगजीच्या मुखापावेतो पोहोचलेल्या होत्या. मंदिर एका छोट्याशा टेकडीवर बांधण्यात आलेलं असल्याने वातावरणात गारवा होता. सकाळचा थंडगार, अवखळ वारा अंगाशी झोंबत होता. सर्वांगावर गोड गोड शिरशिरी उभी करीत होता. येताना तो आपल्याबरोबर मंद सुगंध घेऊन आलेला होता. त्यामुळे सभामंडपात चौथऱ्यावर बसून असलेल्या जयवंतादेवी आणि प्रताप यांची मनं प्रसन्न बनली होती. मुद्राही उत्तेजित दिसत होत्या त्यांच्या. दोघांच्या ओठांवर मोहक हसू तरळत होतं.

प्रतापची तेज, धारदार नजर अवखळ वाऱ्यासारखीच इतस्तत: विहार करीत होती.

सात सालांची उमर होती त्याची. पण वयाच्या मानाने तो बराच उंच दिसत होता. त्याची अंगकाठीही जन्मत:च भरलेली होती. रुंद खांदे, भरदार छाती, लांबलचक, बळकट बाहू रजपूत वीराला साजेसेच होते. गोल चेहरा, धारदार लांबसडक नासिका, रुंद कपाळ, किंचित मोठे डोळे, भरीव गाल आणि शरीराचा गौर वर्ण... शिसोदिया वंशातील पराक्रमी